एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम - ३
कक्ष अधिकारी गट ब संवर्गातील उमेदवारांच्या नियमित पदस्थापनेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांकः कअस १३१५/प्र.क्र.११३/१४ब

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २०१८

संदर्भ :

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन २०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दिनांक २०.०१.२०१४
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. कअस १३१५/प्र.क्र.१०७/१४ब, दिनांक ०४.०४.२०१६
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. कअस १३१५/प्र.क्र.११३/१४ब, दिनांक १३.१०.२०१६
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. कअस १३१५/प्र.क्र.१०७/१४ब, दिनांक १०.०५.२०१८

प्रस्तावना :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा (मुख्य) परीक्षा - २०१५ च्या आधारे शिफारस केलेल्या व एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम -३ अंतर्गत प्रशिक्षण घेणा-या कक्ष अधिकारी - गट ब या संवर्गातील उमेदवारांकरिता संदर्भाधीन क्र. २ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवर दिनांक ०२.०५.२०१६ पासून दोन वर्षांच्या कालावधीकरिता रू.९३००-३४८००, ग्रेड वेतन रू. ४८००/- या वेतनश्रेणीत अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली असून सदर अधिसंख्य पदांना दिनांक ३१.०५.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सीपीटीपी -३ अंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या १६ परिविक्षाधीन कक्ष अधिकाऱ्यांची प्रशिक्षण कार्यक्रम कालावधीमध्ये कक्ष अधिकारी पदाच्या स्वतंत्र कार्यभाराकरिता संदर्भाधीन क्र.३ च्या आदेशान्वये मंत्रालयीन विभागांमध्ये नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर परिविक्षाधीन कक्ष अधिकाऱ्यांसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवर निर्माण केलेल्या अधिसंख्य पदांचा कालावधी दिनांक ३१.०५.२०१८ रोजी समाप्त होत असल्याने त्यांची कक्ष अधिकारी संवर्गातील रिक्त पदांवर नियमित पदस्थापना देणे आवश्यक आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा (मुख्य) परीक्षा - २०१५ च्या आधारे शिफारस केलेल्या सीपीटीपी-३ अंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या कक्ष अधिकारी - गट ब या संवर्गातील सध्या कार्यरत असलेल्या खालील १४ परिविक्षाधीन कक्ष अधिकाऱ्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या विभागामध्ये दिनांक ०१.०६.२०१८ पासून पदस्थापना देण्यात येत आहे.

अ.क्र.	परिविक्षाधीन कक्ष अधिकाऱ्याचे नाव	नियुक्तीचा विभाग
१.	श्री. दिनेश आप्पाजी सस्ते	गृह विभाग
२.	श्री. मनिष शेषराव मिलके	कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
३.	श्री. गोविंद चांगोजी भिसे	सार्वजनिक आरोग्य विभाग
४.	श्री. सागर अर्जुन मोरे	महसूल व वन विभाग
५.	श्री. प्रवीण महावीर पाटील	नगरविकास विभाग
६.	श्री. देवेंद्र पंडित भामरे	जलसंपदा विभाग
७.	श्रीमती सुप्रिया किसनराव घोटाळे	उच्च व तंत्रशिक्षण विभाग
८.	श्री. प्रसेनजीत ज्ञानेश कारलेकर	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
९.	श्रीमती वंदना पुनमचंद जैन	सामान्य प्रशासन विभाग
१०.	श्रीमती अश्विनी अशोक जाधव	कृषि व पदुम विभाग
११.	श्री. प्रवीण पांडुरंग कोळी	गृहनिर्माण विभाग
१२.	श्रीमती प्रज्ञा विजयसिंह देशमुख	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
१३.	श्री. सिध्दार्थ साहेबराव घोरपडे	विधी व न्याय विभाग
१४.	श्रीमती दिपाली चंद्रकांत दिवटे	उद्योग, उर्जा व कामगार विभाग

२. सदर कक्ष अधिकाऱ्यांच्या दिनांक ०१.०६.२०१८ पासून वेतन व इतर सर्व सेवाविषयक बाबी संबंधित विभागाकडे राहतील.

३. सदर कक्ष अधिकाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग/कार्या-सीपीटीपी ब कडून होणार असून याबाबतचे आदेश यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५३०१०४५३२२९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.05.30 10:46:03 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संबंधित परिविक्षाधीन कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई ३२.

प्रत,

१. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, सामान्य प्रशासन विभाग/ गृह विभाग/ कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/सार्वजनिक आरोग्य विभाग/ महसूल व वन विभाग/ नगरविकास विभाग/ जलसंपदा विभाग/उच्च व तंत्रशिक्षण विभाग/ कृषि व पदुम विभाग/गृहनिर्माण विभाग/विधी व न्याय विभाग/उद्योग, उर्जा व कामगार विभाग/उद्योग, उर्जा व कामगार विभाग/ सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग/ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई-३२. (संबंधित विभागामार्फत)

२. सह /उप सचिव (आस्थापना), सामान्य प्रशासन विभाग/ गृह विभाग/ कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/सार्वजनिक आरोग्य विभाग/ महसूल व वन विभाग/ नगरविकास विभाग/ जलसंपदा विभाग/उच्च व तंत्रशिक्षण विभाग/ कृषि व पदुम विभाग/गृहनिर्माण विभाग/विधी व न्याय विभाग/उद्योग, उर्जा व कामगार विभाग/उद्योग, उर्जा व कामगार विभाग/ सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग/ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग , मंत्रालय, मुंबई ३२.

३. महालेखापाल -१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.

४. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.

५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

६. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे.

७. महासंचालक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, वनामती, बोले पेट्रोल पंप जवळ, अमरावती रोड, धरमपेठ, नागपूर - ४४२ ४१०.

८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

९. अवर सचिव, (का. क्र.सीपीटीपी ब), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. अवर सचिव, का. क्र.२६ , सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

११. निवडनस्ती.